महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
तिसरा मजला, मंत्रालय विस्तारीत इमारत,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
Email:-textilepolicy-mah@nic.in

---

क्र.संकीर्ण - १२२५/प्र.क्र.४४/टेक्स-५ दिनांक:- २२ एप्रिल, २०२५

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) महाव्यवस्थापक, महावितरण, मुंबई-०१.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण).
४) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे.
५) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे.
६) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
७) श्री.अभय हरणे, प्रकल्प संचालक, महाजेनको.
८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई.

**विषय:**- राज्यातील सूतगिरण्यामध्ये प्राधान्याने सौर ऊर्जेचा वापर वाढविणेबाबत चर्चा करण्यासाठी आयोजित दि.०९.०४.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**संदर्भ:**- या विभागाचे समक्रमांकित दि.०२.०४.२०२५ व दि.०८.०४.२०२५ रोजीची पत्रे.

महोदय,

संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन करावे.

२. राज्यातील सूतगिरण्यामध्ये प्राधान्याने सौर ऊर्जेचा वापर वाढविणेबाबत चर्चा करण्यासाठी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.०४.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता मा.मंत्री (वस्त्रोद्योग) महोदयांचे मंत्रालयीन दालन क्र.३०३, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२ येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

३. सदर बैठकीचे इतिवृत्त पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरीता यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

सोबत- वरीलप्रमाणे

(प्रमोद पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

२) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३) उप सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

४) अवर सचिव (टेक्स-२)/कक्ष अधिकारी (टेक्स-१अ/ कक्ष अधिकारी (टेक्स-१ब), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना विनंती करण्यात येते की, या इतिवृत्तातील मुद्दे क्र.२ व ३ आपल्या कार्यासनांशी संबंधित असल्याने सदर मुद्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

५) निवडनस्ती (टेक्स-५)

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/टेक्स-५

# बैठकीचे इतिवृत्त

राज्यातील सूतगिरण्यामध्ये प्राधान्याने सौर ऊर्जेचा वापर वाढविणेबाबत चर्चा करण्यासाठी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.०४.२०२५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेदरम्यान खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

| अ.क्र. | बैठकीत घेण्यात आलेले निर्णय | कार्यवाही करणारा विभाग/कार्यासन |
|---|---|---|
| १ | १.तामिळनाडू राज्यात वस्त्रोद्योग खुप मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे हा उद्योग वाढण्यामध्ये स्वस्त दरातील वीज हे प्रमुख कारण आहे. तामिळनाडू राज्याने वस्त्रोद्योग क्षेत्रातील विविध घटकांनी उदा. सुतगिरणी व संलग्नित प्रकल्प यांनी सौर ऊर्जा प्रकल्प सुरु केल्यास मेगावॅटची मर्यादा न घालता त्यांना नेट मिटरींगची NET METERING सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. महाराष्ट्रात सुतगिरण्यांना स्वस्तात वीज मिळावी म्हणून सहकारी सुतगिरणी रु.३/- प्रति युनिट तर खाजगी सुतगिरण्यांना २/- प्रति युनिट वीज दर सवलत देण्यात येते. वस्त्रोद्योगाच्या सर्व घटकांवर ऊर्जा विभागामार्फत रु. २५०० ते ३००० कोटी इतका खर्च वीज दर सवलत अनुदानासाठी होत आहे. त्यापैकी सुतगिरण्यांवर १००० कोटी इतका खर्च होतो. याप्रमाणे पुढील ५ वर्षात ५००० कोटी होणे अपेक्षित आहे. सुतगिरण्यांना LITHIUM BATTERY खरेदीकरिता टप्पा-टप्पाने शासनामार्फत रु. ३०००/- कोटी अनुदान दिले तर सुतगिरण्यांना वीज अनुदान देण्याची आवश्यकता पडणार नाही. येत्या ५ वर्षात किमान रु २००० कोटींची बचत होईल. त्यासोबत वस्त्रोद्योगाची भरभराट होऊन त्याद्वारे GSTचे उत्पन्न वाढून राज्याच्या तिजोरीत भर पडेल. याकरिता ऊर्जा विभागाने यासंदर्भातील तुलनात्मक अभ्यास करुन प्रस्ताव तातडीने तयार करावा. | ऊर्जा विभाग (उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग) |
| | २. सुतगिरण्यांचे प्रकल्प अहवाल किंमत रु.११८/- कोटी करणेबाबतचा आयुक्त, वस्त्रोद्योग यांचेकडून आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही विभागाने तात्काळ करावी. | कार्यासन टेक्स-१ (अ) टेक्स-१ (ब)/, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग |

| | | |
|---|---|---|
| | ३. वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये १८ मिनी टेक्सटाईल्स पार्क स्थापन करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. परंतू अदयाप पर्यंत एकही मिनी टेक्सटाईल पार्क स्थापन झालेले नाही हे पाहता सदर मिनी टेक्सटाईल पार्कच्या अटी शर्ती मध्ये जमिन एमआयडीसी क्षेत्रातील असावी तसेच सदर पार्क उभारणी खाजगी प्रकल्पामार्फत करण्याबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सहकारी संस्थांचा समावेश करण्याबाबत तपासणी करण्यात यावी व जमिनीबाबतची अट सुधारीत करणे आवश्यक आहे. तसेच सुतगिरणी प्रकल्प अहवालाची प्रस्तावित किमत रु.११८/- कोटी असल्याने मिनी टेक्सटाईल्स पार्कच्या किंमतीबाबत फेरविचार करुन किंमत सुधारीत करण्यात यावी. | कार्यासन टेक्स-२, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग |

************************************